आदिम जमातीचा विकास या राज्य योजनेंतर्गत आदिम जमातीच्या कुटुंबाकरिता घरकुल बांधणेकरिता लक्षांक ठरविणेबाबत...

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन शुद्धीपत्रक: आदिम-२०१४/प्र.क्र.६५ (भाग १)/का.-१९

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २३/०९/२०२१

वाचा -

१. शासन निर्णय क्र. आदिम-२०१५/प्र.क्र.८९/का.-१९, दि.३१/०३/२०१६
२. आयुक्त, आ.वि. यांचे पत्र क्र. आदिम घरकुल २०१७-१८/प्र.क्र.४२(१७)/ का.५(३) दिनांक १६/०७/ २०२१

प्रस्तावणा-

संदर्भिय शासननिर्णयान्वये आदिम जमाती घरकुल योजनेंतर्गत सन २०१५-१६ करीता एकुण ०७ जिल्ह्यांकरीता १४०० इतका लक्षांक निश्चित करणेत आला आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्याकरिता १५५ इतक्या घरकुलाचा लक्षांक निर्धारित करणेत आला आहे. तथापि, नांदेड जिल्ह्यामध्ये योजनेंतर्गत घरकुल देण्याकरीता पुरेसे पात्र लाभार्थी उपलब्ध होत नसल्याने योजनेचे उद्दिष्ट साध्य करण्यास अडचणी येत आहेत. सबब, सदर लक्षांक इतर जिल्ह्यास वळता करण्याची विनंती संदर्भीय पत्रान्वये करणेत आली आहे. त्यानुषंगाने नांदेड जिल्ह्याकरीता सन २०१५-१६ या वर्षामध्ये देणेत आलेला १५५ लक्षांक रद्द करुन सदर लक्षांक ठाणे जिल्ह्यास वळता करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन शुद्धीपत्रक-

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ करीता आदिम जमाती घरकुल योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यास देणेत आलेला १५५ घरकुलांचा लक्षांक रद्द करणेत येत आहे.

२. नांदेड जिल्ह्याकरीताचा १५५ इतका लक्षांक ठाणे जिल्ह्यास वळता करणेस मान्यता देणेत येत आहे.

३. याद्वारे असे ही स्पष्ट करणेत येते की सन २०१५-१६ करीता प्रस्तुत योजनेंतर्गत निश्चित एकुण लक्षांकामध्ये कोणतीही सुधारणा नाही.

४. हे शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०९२३१५४६१५०९२४ असा आहे. हे शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash Vijay Waje

Digitally signed by Prakash Vijay Waje
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1b4b695a8c26d140fc5c049d281eedbf23beed9a89ad7526416132cf28f14776, pseudonym=23F17B7ABBFC6358B3073C61D025B7893A825E98, serialNumber=400892E5E82479E4F3C8CF46538DC917B7071E979796D37178D3B709E19155AB, cn=Prakash Vijay Waje
Date: 2021.09.23 15:47:33 +05'30'

(प्रकाश वि. वाजे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

३. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (ग्रामविकास), मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, आदिवासी विकास यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
६. अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती, ठाणे
७. उप सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
८. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास कार्यालय, किनवट,शहापुर.
९. राज्य संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष- ग्रामिण गृह निर्माण, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
१०. नियोजन विभाग/वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.